प्राथमिक शिक्षकांना २४ वर्षांच्या सेवेनंतर
निवडश्रेणी लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन शुद्धिपत्रक क्रमांक: पीआरई २००२/(३३०२)/प्राशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १५ नोव्हेंबर, २००६

वाचा :शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय,क्रमांक:पीआरई २००२/(३३०२)/प्राशि-१,दिनांक २०एप्रिल, २००६.

**शासन शुद्धिपत्रक:-** संदर्भाधीन शासन निर्णयातील खाली नमूद केलेला परिच्छेद २ -

"तसेच त्रिस्तरीय वेतनश्रेणी देतांना वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ज्या विहित अटी नमूद केल्या आहेत, त्या निवड श्रेणीसाठी लागू असतील. तसेच शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, दिनांक २.९.१९८९ सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये निवड श्रेणी प्राप्त करण्यासाठी विहित केलेल्या इतर सर्व अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे."

ऐवजी

"२. दिनांक १.१.१९८६ पासून वरिष्ठ श्रेणीत वेतन घेणाऱ्या व दिनांक १.१.१९८६ रोजी किंवा त्यानंतर २४ वर्षांची अर्हताकारी सेवा पूर्ण झालेल्या प्राथमिक शिक्षकांना निवडश्रेणी प्राप्त करण्यासाठी दिनांक २.९.१९८९ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टामधील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे. याच शासन निर्णयाच्या परिच्छेद २(क) च्या संदर्भात स्पष्ट करण्यात येते की :-

१) वरिष्ठ श्रेणीत वेतन घेणाऱ्या व दिनांक १.१.१९८६ रोजी सलग २४ वर्षाच्या अर्हताकारी सेवेच्या तरतूदीमुळे, आता वरिष्ठ श्रेणीत १२ वर्ष अर्हताकारी सेवेची अट शिथील झाली आहे. म्हणजेच वरिष्ठ वेतनश्रेणीत १२ वर्षाहून कमी अर्हताकारी सेवा झाली तरी १.१.१९८६ रोजी सलग २४ वर्ष अर्हताकारी सेवा पूर्ण करणारा प्राथमिक शिक्षक, अन्य विहित अटी पूर्ततेच्या अधीन राहून निवडश्रेणीस पात्र राहील.

२) दि. १.१.१९८६ रोजी ज्या प्राथमिक शिक्षकांची सलग सेवा १८ वर्षे किंवा १८ वर्षापेक्षा जास्त झाली असेल अशा प्राथमिक शिक्षकांना निवड श्रेणीसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मिळविण्यापासून सूट मिळू शकेल. तथापि, दिनांक १.१.१९८६ ला ज्यांनी १८ वर्षे पूर्ण एवढी सेवा केली नसेल अशा शिक्षकांना विहित शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याशिवाय त्यांचा निवड श्रेणीसाठी विचार करता येणार नाही." असा वाचावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( दि. दा. आढाव )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, बृहन्मुंबई
निवासी लेखाधिकारी, मुंबई
लेखा परीक्षक,स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व मुख्य अधिकारी, नगरपालिका
सर्व शिक्षणाधिकारी (म.न.पा.शिक्षण मंडळे),महानगरपालिका
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद
सर्व जिल्हा कोषागारे
मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री,शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
कार्यासन व्यय-१ सेवा-९, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
कार्यासन (आस्था-५), ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने
प्रत निवड नस्ती प्राशि-१